जाहिर नोटीस

याद्वारे तमाम पुरवठादार यांस कळविणेत येते की, मा.जिल्हा व सत्र न्यायालय सिंधुदुर्ग-ओरोस यांजकडील म.जा.क्र 4277 सन 2025 दि.31/07/2025 चे आदेशान्वये मे. दिवाणी न्यायालय (व.स्तर) ,सिंधुदुर्ग-ओरोस येथील कार्यालयीन वापराकरीता 220**Ah** क्षमतेच्या दोन बॅटरी युनिट खरेदी करणेसाठी याव्दारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती-

1. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. दिवाणी न्यायालय (व.स्तर) ,सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नावे असावेत. लखोटयावर "बॅटरी खरेदीकरीता दरपत्रक" असा उल्लेख करणेत यावा.

2. दरपत्रक सादर करणाऱ्या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करातंर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

3. पुरवठादार जुनी बॅटरी Buy Back ने घेणेस तयार असतील तर त्यांच्या Buy Back रक्कमेचा दरपत्रकामध्ये स्पष्ट उल्लेख असावा.

4. वस्तूंच्या दर्जाबाबत खात्री पुरवठादार यांनी दयावयाची आहे. हमी कालावधीमध्ये बॅटरीमध्ये बिघाड झाल्यास ते नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

5.कार्यालयामध्ये बॅटरी बसविणेकरीता येणारा खर्च, वाहतूक खर्च तसेच तत्संबधी येणारा अन्य खर्च संबंधीत पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

6. जाहीर निविदेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

7. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

8. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) ,सिंधुदुर्ग-ओरोस यांचा राहील.

तरी इच्छुक वरील अटी व शर्तीस अधीन राहून ही निविदा प्रसिध्द केलेपासून 10 दिवसांच्या आत आपली दरपत्रके बंद लखोटयातून दिवाणी न्यायालय (व.स्तर) ,सिंधुदुर्ग-ओरोस येथे सादर करावीत.

Patil

दिनांक - 24/09/2025

प्र. सहा.अधीक्षक (वित्त),
दिवाणी न्यायालय (व.स्तर),
सिंधुदुर्ग-ओरोस

-----------------------------oooooooo-----------------------------

म.जा.क्र.3880 सन 2025.
दिवाणी न्यायालय (व.स्तर)
सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक –24/09/2025

प्रत माहितीसाठी व नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी रवाना .

१. मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस **(ई–मेलव्दारे)**
२. मा. मुख्य्‍ कार्याकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस **(ई–मेलव्दारे)**
३. मा.जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस **(ई–मेलव्दारे)**
४. मा.मुख्य्‍न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस **(ई–मेलव्दारे)**
५. मा.सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस **(ई–मेलव्दारे)**
६. मा.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग **(ई–मेलव्दारे)**